वृत्तपत्राचे नांव - संचार
दिनांक - 23/9/2016

# मानवी हक्कांची जपणूक व्हावी : न्यायमूर्ती बन्नूरमठ

## सोलापूर विद्यापीठात मानवी हक्क कार्यशाळेस प्रारंभ

**संचार प्रतिनिधी**

**सोलापूर, दि.२२** - मानवतेवरील आपला विश्वास दृढ करून, विश्वबंधुत्वाचा विचार जोपासत इतरांच्याही मानवी हक्कांची जपणूक केली पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस. आर. बन्नूरमठ यांनी केले.

गुरूवारी, सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे संकुलाच्यावतीने आयोजित दोन दिवसीय मानवी हक्क कार्यशाळेचे उद्घाटन न्यायमूर्ती बन्नूरमठ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. एन. एन. मालदार हे होते. याप्रसंगी राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम. ए. सईद आणि आयपीएस अधिकारी भगवंतराव मोरे तसेच कुलसचिव डॉ. देबेंद्रनाथ मिश्रा, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके, हैदराबादचे प्रा. शिवा प्रसाद, प्रा. सुधीर जेकब, गोव्याचे डॉ. बद्रुदिन, म्हैसूरचे प्रा. मुझफ्फर असादी, बीसीयूडीचे संचालक प्राचार्य आर. वाय. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. ई. एन. अशोककुमार यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. माया पाटील यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला.

न्यायमूर्ती बन्नूरमठ म्हणाले की, २०१३ पासून राज्य मानवी हक्क आयोग कार्यरत असून या माध्यमातून जनतेला न्याय मिळवून देण्यात येत आहे.

पान ३ वर



**सोलापूर : सोलापूर विद्यापीठात आयोजित मानवी हक्क कार्यशाळेचे उद्घाटन करताना न्यायमूर्ती एस. आर. बन्नूरमठ, कुलगुरू डॉ. एन. एन. मालदार, एम. ए. सईद, डॉ. माया पाटील व अन्य.**

## मानवी हक्कांची जपणूक...

सार्वजनिक प्राधिकरणात कार्य करणाऱ्या व्यक्ती मानवी हक्क उल्लंघनाच्या तक्रारींबाबत योग्य कार्यवाही करीत नसतील तर अशा व्यक्ती व प्राधिकरणावर कारवाई करून सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम आम्ही करीत आहोत. आयोगाकडे आलेली प्रकरणे निकाली काढताना आम्ही अर्जदारांकडून कोणतेही शुल्क आकारात नाही.

मानवी हक्कांचे उल्लंघन कोठे होत असेल तर कोणीही यासंदर्भात आयोगाकडे याची माहिती देऊ शकतात. गरज पडल्यास आयोग स्वत:हून काही प्रकरणात लक्ष घालून कार्यवाही करते, असेही त्यांनी यावेळी सांगितले. याबरोबरच जागतिकीकरणाच्या आजच्या कालखंडात अधिकाधिक संकुचित व स्वकेंद्रित विचारांचा प्रवाहदेखील सुरू असल्याचे न्यायमूर्ती बन्नूरमठ म्हणाले. कुलगुरू मालदार म्हणाले की, आपण आपल्या हक्कांबाबत जेवढे जागरूक असतो तेवढ्याच इतरांच्याही मानवी हक्कांचा विचार करून त्यानुसार आपल्या वागणुकीत बदल करणे आवश्यक आहे. उद्या (शुक्रवारी) कार्यशाळेत विविध तज्ज्ञांचे व्याख्यान होणार आहे. शेवटी आभार डॉ. प्रकाश व्हनकडे यांनी मानले.